N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** कर्जत **Year (वर्ष):** 2022
   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0227 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 14/07/2022 02:26 वजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)** **Sections (कलम)**

| S.No. | Acts | Sections |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. Day(दिवस): दरमियानी दिन
   Time Period (कालावधी):
   **Date From** (दिनांक पासून): 13/07/2022
   **Date To** ( दिनांक पर्यंत): 14/07/2022
   **Time From** (वेळेपासून): 15:23 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 02:26 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
   **Date** (दिनांक ): 14/07/2022 **Time** (वेळ): 02:26 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
   Entry No. (नोंद क्र.): 003 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 14/07/2022 02:26 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
   1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 200 किमी
   **Beat No.** (बिट क्र.):
   (b) **Address** (पत्ता): मौजे भुमी अभिलेख कार्यालय

   (c) In case, **outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव): कर्जत
   **District(State)** (जिल्हा(राज्य)): रायगड(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) Name (नाव): अब्दुल हमीद अहमदमियाँ पटेल
   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1959 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address** (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | पो खारघर, ता पनवेल,सेक्टर 30, जामा मशिद जवळ,रा मुकामघर नं66, ओवे गाव, जि रायगड,कर्जत,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | पो खारघर, ता पनवेल,सेक्टर 30, जामा मशिद जवळ,रा मुकामघर नं66, ओवे गाव, जि रायगड,रायगड,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9820960584

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बालाजी रावसाहेब राऊत | | | 1. रा मुद्रे, ता कर्जत,कर्जत,रायगड,महाराष्ट्र, भारत<br>2. रा मुपो देवळाली,,ता कळंब, जि उस्मानाबाद,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

मी अब्दुल हमीद अहमदमियाँ पटेल, वय 63 वर्षे, व्यवसाय - बिल्डींग मटेरियल सप्लायर, रा. मुकाम.घर नं.66, ओवे गाव., सेक्टर 30, जामा मशिद जवळ, पो. खारघर, ता. पनवेल, जि. रायगड मोबाईल नं. 9820960584 समक्ष कर्जत पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर लिहून देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. माझी मालकीची मौजे कळंब ता.कर्जत येथे सव्हे नं.150/1, 150/11/ऐ, 150/12, 150/5, 150/7 अशी जमिन असुन सदर जमिन विनशेती करण्यासाठी मी सन 2021 मध्ये जिल्हाधिकारी रायगड अलिबाग कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यानंतर सदर प्रकरणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात पाठपुरावा केला असता त्यांनी आमचे प्रकरण जमिन मोजणी कामी भुमी अभिलेख कार्यालय,कर्जत येथे पाठविले असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे माझे वर नमुद जमिन बिनशेती संदर्भात जमिन मोजणी करीता मी भुमि अभिलेख कार्यालय कर्जत येथे जावून श्री.राऊत यांचेकडे चैकशी केली असता त्यांनी मला ऑनलाईन चलन देवून बंकेमध्ये शासकिय फी चे चलन भरून त्याची पावती कार्यालयात जमा करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी दिनांक 28/03/2022 रोजी एसबीआय षाखा कर्जत बंकेमध्ये जावून ऑनलाईन पध्दतीने चलनाने 18,000/- रूपये फी जमिन मोजणी कामी भरली व त्याची पावती श्री. राऊत यांचेकडे दिली. त्यानंतर सुमारे 10 दिवसांपुर्वी श्री.राऊत यांनी मला भुमी अभिलेख कार्यालयाकडील दिनांक 21/6/2022 रोजीचे तारखेची माझे वर नमूद जागेचे मोजणीकरीता दिनांक 8/7/2022 रोजीची तारीख नेमण्यांत आली असून त्यामध्ये मोजणी करणारे कर्मचारी म्हणून श्री.बी.आर.राऊत यांचे नाव असलेली लेखी नोटीस दिली. व मोजणीच्या अनुषंगाने मला दिनांक 8/7/2022 रोजी कर्जत भुमी अभिलेख कार्यालय येथे हजर राहणेबाबत समक्ष सांगीतले. त्याप्रमाणे मी दिनांक 08/07/2022 रोजी सुमारे 11-00 वाजता भुमि अभिलेख कर्जत कार्यालयात जावून श्री. राऊत यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. राऊत यांनी मला सांगितले की, मोजणीची आवश्यकता नाही. मी कार्यालयात बसून मोजणी केल्याचे दाखवतो. व सर्व क्लियर करून नकाषा तुमच्या हातात देतो, त्याकरीता तुम्हाला दिड लाख रूपये दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी श्री. राऊत यांना ठिक आहे असे सांगून निघून गेलो. परंतु मी जमिन मोजणीकामी यापुर्वी 18000/- इतकी षासकीय फी भरली असून मला श्री. राऊत, कर्मचारी भुमी अभिलेख कार्यालय, कर्जत यांना माझे जागेची जमिन मोजणीचे कामाकरीता लाच देण्याची इच्छा नसल्याने मी समक्ष अँन्टी करप्षन ब्युरो, रायगड अलिबाग कार्यालयात येवून श्री.राऊत, कर्मचारी भुमी अभिलेख कार्यालय कर्जत हे माझेकडे माझे मौजे कळंब, ता. कर्जत येथील जमिन मोजणी करीता लाच मागत असलेबाबत तक्रार देत आहे. तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेकरीता मी दिनांक 11/07/2022 रोजी पोनि/श्री.गलांडे, अँन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग यांचेकडे अँन्टी करप्षन ब्युरो रायगड-अलिबाग कार्यालय येथे समक्ष लेखी तक्रार दिली.त्यानंतर पोनि/गलांडे यांनी मला सांगितले की, लोकसेवक श्री.राऊत यांनी मला बुधवार दि. 13/07/22 रोजी भुमी अभिलेख कार्यालय

कर्जत येथे भेटण्यास सांगितल्याने मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 13/07/2022 रोजी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीकरीता मला दिनांक 13/07/2022 रोजी मोबाईलवर संपर्क साधुन कर्जत येथे 13.00 वाजता हजर राहावयास सागितले. त्याप्रमाणे दि. 13/07/2022 रोजी पोनि श्री. गलांडे यांनी मला मोबाईलवर संपर्क साधुन पळसदरी फाटा कर्जत येथे येण्यास सांगितले त्याप्रमाणे मी पळसदरी फाटा कर्जत येथे माझा मुलगा कु. जुनेद पटेल सह माझे इन्होवा कार क्र.एमएच-46-अव्ही 2929 ने 13.00 वाजता गेलो असता पोनि/गलांडे व स्टाफ असे खाजगी ईन्होवा कार एमएच-48-अ 4876 सह हजर होते. पोनि/गलांडे यांनी पडताळणी पथकातील पोलीस अंमलदार व पंच साक्षीदार 1)श्री. सौरभ पाटील, वनरक्षक 2)श्री. अषोक षिंदे, वनरक्षक यांचेषी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि/गलांडे यांचे सूचनेप्रमाणे मी माझे तक्रारीची हकीगत पंचाना सांगितली. त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारीवर व सोबतचे कागदपत्रांवर सहया केल्या. त्यानंतर माझे व पंचाचे वक्तव्य घेण्यात आले व पोनि श्री गलांडे यांनी आम्हाला पडताळणीकरीता योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि/श्री.गलांडे यांचे सुचनेनुसार 13-48 वाजता पोना/खंडागळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून होल्डवर ठेवून माझे शर्टच्या समोरील डावे खिशामध्ये ठेवुन मी व पंच श्री. पाटील असे माझे ईन्होवा कारने भुमी अभिलेख कार्यालय कर्जत मी लोकसेवक श्री. राऊत असलेल्या ठिकाणी जावून त्यांची भेट घेतली असता लोकसेवक श्री.राऊत यांनी माझेकडे दिड लाख रूपयांची मागणी केली. व डायरेक्ट नकाशा देतो हातात असे सांगितले. त्यानंतर मी आता माझेकडे पंचवीस हजार रूपये आहेत असे सांगितले असता देवून ठेवा असे बोलून लाचेची मागणी केली व पंचवीस हजार रूपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर पंच श्री.पाटील व मी असे माझे गाडीने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पोनि/श्री. गलांडे यांनी मला व पंच 1 यांना घडलेली हकिगती बाबत विचारले. त्यानंतर पोनि गलांडे व पडताळणी पथक यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधिल माझे व लोकसेवक श्री. राऊत यांचे ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले व खात्री केली असता लोकसेवक श्री. राऊत माझेकडुन एक लाख पन्नास हजार रूपये लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले. व पंचवीस हजार रूपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर पोनि/गलांडे यांनी मला व पंचांना सांगितले की, लोकसेवक श्री. राऊत यांनी केलेल्या मागणीच्या अनुशंगाने सापळा आजमावण्याचा निर्णय घेवुन सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही सुरू केली. त्यानंतर माझी अंगझडती घेतली. त्यानंतर लोकसेवक यांनी मागणी केलेल्या एक लाख पन्नास हजार रूपये रक्कमेपैकी पंचवीस हजार रूपये लाचेची रक्कम म्हणुन वापरण्यात येणा-या पाचषे रूपये दराच्या 50 चलनी नोटा असे एकूण 25,000/- रूपये मी पोनि श्री. गलांडे यांच्यासमोर हजर केल्या. त्यानंतर पोनि/गलांडे यांचे सुचनेवरून मपोना स्वप्नाली पाटील यांनी मला व पंचाना अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले व प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर पोनि श्री. गलांडे यांचे सुचनेवरून मपोना/स्वप्नाली पाटील यांनी सदर चलनी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन तक्रारदार श्री. पटेल यांचे पन्टेच्या समोरील डाव्या खिशात अलगदपणे ठेवुन दिल्या. त्यानंतर पोनि श्री.गलांडे यांचे सूचनेवरुन मला व दोन्ही पंचांची वक्तव्ये आम्हास वाचण्यास सांगून डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली. आम्हास योग्य त्या सुचना दिल्या व समयसुचकतेप्रमाणे राहण्यास सांगितले. त्यानंतर पोनि/गलांडे यांचे सुचनेवरून पोना/खंडागळे यांनी त्यांच्याकडील डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो होल्डवर ठेवुन तक्रारदार यांच्या षर्टच्या समोरील डावे खिषात ठेवुन दिला. त्यानंतर पोनि/गलांडे यांचे सुचनेवरून मी व पंच नं.1) श्री. पाटील असे माझे ईनोव्हा कारने पळसदरी फाटा कर्जत येथुन निघुन भुमी अभिलेख कार्यालय कर्जत येथे आलो. आमचे मागोमाग सापळा पथक व पंच नं.2) असे त्यांचे ईन्होवा कारने भुमी अभिलेख कर्जत कार्यालयाच्या आजुबाजुस कोणास संशय येणार असे थांबले. मी व पंच नं.1) श्री. पाटील असे मुख्य प्रवेषद्वाराने आत गेलो. पंच नं. 1) श्री.पाटील हे कार्यालयाच्या दरवाजा जवळ थांबुन राहिले. त्यानंतर मी लोकसेवक श्री. राऊत असलेल्या ठिकाणी गेलो व लाचेची रक्कम 25,000 रूपये माझे पन्टचे समोरील डाव्या खिशातुन डाव्या हाताने काढुन लोकसेवक श्री. राऊत यांचेकडे दिली असता पंचवीस आहेत...बरं लोकसेवक राऊत यांनी 25,000 रू. रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांचे पन्टचे मागील बाजुच्या उजव्या हिपपॉकेट ठेवुन दिली. त्यानंतर मी बाकी रक्कम हि काम झाल्यावर देतो असे सांगितले व किती बाकी आहेत असे विचारले असता लोकसेवक श्री. राऊत यांनी एक पंचवीस बाकी आहेत असे सांगितले. तसेच जमीन मोजणीच्या बाबतीत विचारले असता दोन दिवसात तयार करतो असे सांगितले व तुम्हाला फोन करतो असे मला सांगितले. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन सापळा पथकास लोकसेवक श्री. राऊत यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबत माझे उजवे खांदयावर रूमाल टाकुन पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर पोनि/गलांडे व सापळा पथकाने लोकसेवक श्री. राऊत यांना रंगेहाथ पकडुन लाचेची रक्कम त्यांचे पन्टचे मागील बाजुस असलेल्या उजव्या हिपपॉकेट मधुन जप्त केली. अशा रितीने श्री.बालाजी रावसाहेब राऊत, वय 32 वर्षे, भुकरमापक, भुमी अभिलेख कार्यालय कर्जत, ता. कर्जत,(वर्ग-3 ) यांनी माझे मौजे कळंब, ता. कर्जत येथिल जमीन मोजणी करून देण्याकरीता दि. 13/07/2022 रोजी 150,000/- रूपये लाचेची मागणी करून त्यातील 25,000/- रूपये लाचेची रक्कम भुमी अभिलेख कार्यालय कर्जत येथे स्विकारली असता अँन्टी करप्शन ब्युरो, रायगड पथकाने रंगेहाथ पकडून लाचेची रक्कम त्यांचेकडून हस्तगत करण्यात आली. म्हणुन माझी श्री. बालाजी रावसाहेब राऊत, वय 32 वर्षे, भुकरमापक, भुमी अभिलेख कार्यालय कर्जत, ता. कर्जत,(वर्ग-3 ), रा. मुद्रे, ता. कर्जत, मुळ रा. मु.पो. देवळाली, ता. कळंब, जि. उस्मानाबाद यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे. ही फिर्याद दिली, सही दि. 13/07/2022

( अब्दुल हमीद अहमदमियां पटेल)

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे कामPOBN67105 हाती घेतले): Kerubhau Dattatray Kolhe(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

A. A. [signature]

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature]

ठाणे अमलदार
कर्जत पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (... का-याची

**Name** (नाव): Kerubhau Dattatray Kolhe
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN67105

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)